महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ❖ ३० मार्च २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक २७२ ❖ पाने - ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024



जल्लोष नववर्षाचा | मराठी अस्मितेचा | हिंदू संस्कृतीचा | सण उत्साहाचा | मराठी मनाचा

सर्व वाचकांना दैनिक जीवनदीप वार्ताच्या संपूर्ण परिवाराकडून

## मराठी नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

# मेट्रोचे जाळे विस्तारणार

## वर्षभरात ४ नव्या मेट्रोची कामे सुरू होणार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे: वाढते शहरीकरण आणि त्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधांची उभारणी मुंबई आणि आसपासच्या परिसरात मोठ्या वेगाने सुरू आहे.मुंबईसोबतच ठाणे आणि आसपासच्या नागरिकांना देखील वेगवान आणि सुलभ प्रवासासाठी मेट्रो प्रकल्पाची कामे सुरू आहेत. त्यातच आता मेट्रोचे जाळे आणखी विस्तारणार असून येत्या वर्षात चार नव्या मेट्रो प्रकल्पांची कामे सुरू होणार आहेत.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा 2025-26 साठीचा 40, 187.41 कोटी रुपयांचा अर्थसंकल्प नुकताच सादर करण्यात आला. मुंबई महानगर प्रदेशातील नागरिकांना अधिकाधिक आणि जागतिक दर्जाच्या सेवा सुविधा उभारण्यासाठी सदर अर्थसंकल्पात 35, 151.14 कोटी रुपये म्हणजेच एकूण खर्चाच्या सुमारे 87 टक्के निधी पायाभूत प्रकल्पांसाठी राखीव ठेवण्यात आला आहे. तसेच येत्या वर्षात चार नव्या मेट्रो प्रकल्पांची कामे सुरू करण्यात येणार आहेत. जाणून घेऊयात 2025-26 या आर्थिक वर्षात हाती घेण्यात आलेले नवीन मेट्रो प्रकल्प कोणते आहेत.



### कोणते आहेत हे चार मेट्रो प्रकल्प?

मेट्रो मार्ग 5 चा विस्तार : दुर्गाडी (कल्याण) ते उल्हासनगर मेट्रो मार्ग 10 : गायमुख ते शिवाजी चौक (मीरा रोड) मेट्रो मार्ग 13 : शिवाजी चौक (मीरा रोड) ते विरार मेट्रो मार्ग 14 : कांजूरमार्ग-बदलापूर

### कसा असेल कांजूरमार्ग - बदलापूर मेट्रो मार्ग?

मेट्रो 14 ही कांजूरमार्ग ते बदलापूर या मार्गावर धावणार आहे. हा मार्ग एकूण 38 किलोमीटर लांबीचा असणार आहे कांजूरमार्ग ते बदलापूर या मेट्रो 14 मार्गावर एकूण 35 स्थानके असणार आहेत मेट्रो 14 चा मार्ग हा कांजूरमार्ग घणसोली- महापे- अंबरनाथ बदलापूर असा असणार आहे

### कसा आहे मेट्रो 5 प्रकल्प?


मेट्रो मार्ग - 5 (ठाणे भिवंडी कल्याण) मेट्रो मार्ग - 5 (ठाणे- भिवंडी- कल्याण) या प्रकल्पाची एकूण लांबी 24.9 कि. मी आहे. सदर मार्गामध्ये 15 मेट्रो स्थानके आहेत सध्या सुरू असलेल्या मेट्रो मार्ग - 4 (वडाळा ते कासारवडवली) आणि प्रस्तावित मेट्रो मार्ग- 12 (कल्याण ते तळोजा) आणि मध्य रेल्वे यांच्यात परस्पर एकीकरण साधण्यात येईल. व्यावसायिक व शासकीय कर्मचारी तसेच ठाणे, भिवंडी व कल्याण परिसरात राहणाऱ्या नागरिकांसाठी हा मेट्रो मार्ग उत्तम सुविधा प्रदान करेल.हा मेट्रो मार्ग सध्याच्या प्रवासाची वेळ 50% ते 75% पर्यंत कमी करेल.

# बदलापूरकरांना गुडी पाडव्याच्या निमित्ताने

## मेट्रो सह शहर विकास प्रकल्पाची भेट -आ किसन कथोरे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्याचे मुख्यमंत्री आदरणीय ना.श्री.देवेंद्र फडणवीस साहेब यांनी शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला हिंदवी स्वराज्याचे संस्थापक राज्याचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वरूढ पुतळ्याचे उदघाटनासाठी आले होते तेव्हा बदलापूरकरांना मेट्रो मार्ग 14 कांजूरमार्ग-तळोजा-बदलापूर लवकरच मंजुरी देऊन कार्यान्वित करणार असल्याचे आश्वासन दिले होते.



कालच एमएमआरडीए चा अर्थसंकल्प सादर झाला त्यामध्ये कांजूरमार्ग-तळोजा बदलापूर मेट्रो मार्ग - 14 ला मंजुरी देऊन बदलापूरकरांना गुढी पाडव्याच्या व मराठी नवीन वर्षाची अनोखी भेट दिली. फक्त मेट्रोच नाही तर बेलवली - कात्रप रेल्वे ओव्हर ब्रिज व कात्रप - ज्यूवेली उर्वरित रिंग रोड च्या कामाला सुद्धा अर्थ संकल्पामध्ये तरतूद करून गुडी पाडव्याच्या भेट दिली आहे. बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले आदरणीय देवेंद्रजी फडणवीस साहेबांचे तमाम बदलापूरकर नागरिकांच्या वतीने जाहीर आभार!

### विमल दिवस निमित्ताने

# मुंबई विद्यापीठ कलिना परिसरात विविध कार्यक्रम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : सुप्रसिद्ध लेखिका, सामाजिक कार्यकर्ता, सजग विचारवंत प्रा. विमलताई गाडेकर यांच्या स्मृती दिनी होणा-या 'विमल दिवस' या कार्यक्रमा निमित्ताने राष्ट्रकवी रामधारी सिंह दिनकर लिखित सुप्रसिद्ध हिंदी नाटक 'रश्मिरथी' याचा प्रयोग होणार आहे.जेष्ठ हिंदी नाट्य आणि सिने कलावंत राष्ट्रीय नाट्य विद्यालयाचे स्नातक हरीश हरिऔध हे नाट्य मंचन करणार आहेत. तसेच श्रीमती अर्चना शंभरकर यांच्या 'सरिनास स्टोरी बोर्ड' या हिंदी कथा संग्रहाचे लोकार्पण होणार आहे.

रविवार दि. 30 मार्च रोजी मुंबई विद्यापीठ विद्यानगरी परिसरातील कवी कुसुमाग्रज मराठी भाषा साहित्य भवन येथे संध्याकाळी चार वाजता हा कार्यक्रम संपन्न होणार आहे. मुंबई विद्यापीठातील संज्ञापन व पत्रकारिता विभाग आणि विमलताई गाडेकर स्मृती सोहळा समितीच्यावतिने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

विमलताई गाडेकर यांच्यावर प्रेम करणारे राज्यभरातील त्यांचे चाहते या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. यात साहित्यिक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, उच्चपदस्थ अधिकारी, डॉक्टर, सिनेसृष्टीतील मान्यवर यांच्यासह विद्यापिठातील प्राध्यापक गण आणि निवडक विद्यार्थी यांचा समावेश असणार आहे.

महाभारताच्या पार्श्वभूमीवर सामाजिक परिस्थीतीवर भाष्य करणा-या अजरामर आशा या राष्ट्रकवी रामधारी सिंह दिनकर यांच्या 'रश्मिरथी' या अभिजात नाट्याचे श्री हरीश हरिऔध हे प्रभावी प्रस्तुतीकरण करणार आहेत.संगीत प्रकाशयोजना आणि चैतन्यपुर्ण अभिनयाचे हे नाट्य असणार आहे.

लेखिका श्रीमती अर्चना शंभरकर यांच्या 'सरिनास स्टोरी बोर्ड' या कथा संग्रहाचे प्रकाशन शब्द विश्व साहित्य संम्मेलन, सिंगापूर येथे झाले आहे. मॅक्स महाराष्ट्रचे संपादक मनोज भोयर आणि जेष्ठ साहित्यिक रजिया सुलताना यांच्या हस्ते हे प्रकाशन झाले असून, भारतात पहिल्यांदा या कथा संग्रहाचे लोकार्पण होणार आहे.

**स्मृतीशेष प्रा. विमलताई गाडेकर यांचा या वर्षी चतुर्थ स्मृती दिवस आहे. यानिमित्ताने रविवार दिनांक ३० मार्च २०२५ रोजी 'विमल दिवस -४' चे आयोजन मुंबई येथे करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे स्वरुप असे आहे, प्रा. विमलताई गाडेकर यांच्या आठवणींना उजाळा, प्रा. विमलताई गाडेकर यांच्या वरील ध्वनीचित्रफीत प्रदर्शन, 'विमलताईचा अभिमान- गौरवोल्लेख सन्मान', अर्चना शंभरकर लिखित 'सरिनास-स्टोरी बोर्ड' या हिंदी कथासंग्रहाचे लोकार्पण, राष्ट्र कवी रामधारी सिंह दिनकर यांनी रचलेल्या 'रश्मी रथी' या हिंदी काव्य नाट्याचे नाट्यकर्मी श्री. हरिश हरिऔंध द्वारा प्रस्तुतीकरण.**

### विमलताई विषयी...

विदर्भातील सुप्रसिद्ध कवयित्री प्रा. विमलताई गाडेकर या चंद्रपूर येथील जनता महाविद्यालयात समाज शास्त्र विषयाच्या प्राध्यापक होत्या. त्यांचे आता पर्यंत अनेक कविता संग्रह आणि कथा संग्रह प्रकाशित झालेले आहेत. त्यांच्या साहित्यावर गोंडवाणा विद्यापिठातील काही विद्यार्थी पी एच डी करित आहेत. आंबेडकरी साहित्यात त्यांच्या साहित्याचा आणि कार्याचा नेहमीच आदराने उल्लेख केला जातो. महिलांच्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक उत्थानासाठी त्यांनी आपले आयुष्य खर्ची घातले.


**विमलताईचा अभिमान- गौरवोल्लेख सन्मान स्मृतिशेष प्रा. विमलताई गाडेकर यांच्या आदर्शांना, आशिर्वादांना, शिकवणुकींना सार्थसिद्ध झाल्या बद्दल आतापर्यंत मानपत्र बहाल करण्यात आलेले मान्यवर असे आहेत, केंद्र शासनातील वरिष्ठ अधिकारी श्री. निखील मेश्राम, इंजिनियर श्रीमती अर्चना राणे -चोपडे, जनसंवाद विभाग प्रमुख डॉ. सुंदर राजदीप, नाट्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मंगेश बनसोडे आणि सिने कलावंत भारत गणेशपुरे.**

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिरासाठी दरमहा ५० हजार रुपये देण्याचे उपमुख्यमंत्र्यांचे आदेश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

क्रूरकर्मा औरंगजेबाच्या कबरीसाठी लाखो रुपये खर्च होत असतांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिरासाठी तुटपुंजे अर्थसाहाय्य हा अन्याय आहे, अशी भूमिका हिंदु जनजागृती समितीच्या शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्यासमोर मांडली. या मागणीवर उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी महसूल विभागाच्या सचिवांना (श्री शिवराजेश्वर मंदिरासाठी) दरमहा ५० हजार रुपये निधी वाढवून देण्यासाठी तात्काळ प्रस्ताव सादर करण्याचे लिखित आदेश दिले. तसेच महसूल विभागाच्या सचिवांना दूरध्वनी करून मंदिरासाठी दरमहा २५० रुपयांऐवजी ५० हजार रुपये देण्याचे स्पष्ट आदेशही दिले. या वेळी शासनाची मदत मिळण्याआधी उपमुख्यमंत्री





श्री. शिंदे यांनी तातडीने वैयक्तिकरित्या महाराजांच्या मंदिरासाठी ५० हजार रुपयांचे साहाय्य करून एक चांगला पायंडाही पाडला. तसेच त्यांनी नियमितपणे मंदिरासाठी निधी घेऊन जाण्यासही सांगितले. हिंदु जनजागृती समितीच्या वतीने उपमुख्यमंत्र्यांनी दिलेल्या सकारात्मक प्रतिसादाबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले.

या प्रसंगी समितीच्या वतीने श्री. सतीश सोनार, श्री. रवि नलावडे आणि नांदेड येथील शिवसेनेचे आमदार श्री. आनंद बोंडारकर उपस्थित होते. केंद्रात काँग्रेस सरकारच्या काळात वर्ष २०१२ पासून क्रूरकर्मा औरंगजेबाच्या कबरीसाठी निधी देणे सुरू करण्यात आले होते. नोव्हेंबर २०२३ पर्यंत भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (ASI) विभागाने औरंगजेबाच्या कबरीच्या देखभालीसाठी ६.५० लाख रुपयांहून अधिक निधी खर्च केला आहे. महाराष्ट्राच्या अस्मितेचा विचार करता औरंगजेब हा एक क्रूर आक्रमक होता. त्याने छत्रपती संभाजी महाराजांवर अमानुष अत्याचार करून निर्घृण हत्या केली. असा आक्रमक आदरास पात्र नाही आणि त्याच्या कबरीच्या देखभालीसाठी निधी खर्च करणे महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला ठेच पोहोचवणारे आहे. त्यामुळे हा निधी सरकारने बंद करावा आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिरासाठी भरीव निधी द्यावा, अशी मागणी समितीने केली.

शिवप्रेमींसाठी सिंधुदुर्ग किल्ल्याचा विकास करा! - छत्रपती राजाराम महाराजांनी स्वतः मालवण येथील सिंधुदुर्ग किल्ल्यावर बांधलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे हे एकमेव आणि प्राचीन मंदिर आहे. त्यामुळे येथे लाखो शिवप्रेमी आणि पर्यटक येतात. किल्ल्यावर बोटीने यावे लागते. त्यामुळे येणाऱ्या पर्यटकांची योग्य सोय करणे आवश्यक आहे. किल्ला मोठा असल्यामुळे झाडी-झुडपे मोठ्या प्रमाणावर वाढली आहेत. त्या हटवून किल्ल्याचे सुशोभीकरण करणे, परिसरात सुंदर बगीचा तयार करणे, पर्यटकांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय, प्रसाधनगृह आणि गोड्या पाण्याच्या विहिरीचे सुशोभीकरण करणे यांसारखी अनेक विकास कामे तातडीने व्हावीत, अशी मागणी उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.



# गीतासार



## अध्याय ६
## आत्मसंयमयोगः

प्रशान्तात्मा विगतभीर्ब्रह्मचारिव्रते स्थितः । मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः ॥ ६-१४ ॥

ब्रह्मचर्यव्रतात राहणाऱ्या निर्भय तसेच अत्यंत शांत अंतःकरण असणाऱ्या सावध योग्याने मन आवरून चित्त माझ्या ठिकाणी लावून माझ्या आश्रयाने राहावे. ॥ ६-१४ ॥

युञ्जन्नेवं सदात्मानं योगी नियतमानसः । शान्तिं निर्वाणपरमां मत्संस्थामधिगच्छति ॥ ६-१५ ॥

मन ताब्यात ठेवलेला योगी अशा प्रकारे आत्म्याला नेहमी मज परमेश्वराच्या स्वरूपाच्या ठिकाणी लावून माझ्यात असणारी परमानंदाची पराकाष्ठा अशी शांती मिळवतो. ॥ ६-१५ ॥

नात्यश्नतस्तु योगोऽस्ति न चैकान्तमनश्नतः । न चातिस्वप्नशीलस्य जाग्रतो नैव चार्जुन ॥ ६-१६ ॥

हे अर्जुना, हा योग फार खाणाऱ्याला तसेच अजिबात न खाणाऱ्याला, फार झोपाळूला तसेच सदा जाग्रण करणाऱ्याला साध्य होत नाही. ॥ ६-१६ ॥

युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु । युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ॥ ६-१७ ॥

दुःखांचा नाश करणारा योग यथायोग्य आहार-विहार करणाऱ्याला, कर्मांमध्ये यथायोग्य व्यवहार करणाऱ्याला आणि यथायोग्य निद्रा-जाग्रण करणाऱ्याला साध्य होतो. ॥ ६-१७ ॥

यदा विनियतं चित्तमात्मन्येवावतिष्ठते । निःस्पृहः सर्वकामेभ्यो युक्त इत्युच्यते तदा ॥ ६-१८ ॥

पूर्णपणे ताब्यात आणलेले चित्त जेव्हा परमात्म्यात पूर्णपणे स्थिर होते, तेव्हा सर्व भोगांची इच्छा नाहीशी झालेला पुरुष योगयुक्त म्हटला जातो. ॥ ६-१८ ॥

# कडुलिंबाचे फायदे



गुडीपाडवा देशातील अनेक राज्यांमध्ये साजरा केला जातो. हा काळ शुभ असल्याचे मानले जाते म्हणून या निमित्ताने महाराष्ट्रीयन लोकांच्या घरोघरी गुढी बांधण्याची पद्धत आहे. या दिवशी श्रीखंड आणि पुरी याचा नैवद्य दाखवला जातो. तसेच या दिवशी एक विशेष काम म्हणजे सकाळी उठल्यावर कडुलिंब खाण्याची पद्त देखील असते. ही प्रथा का आहे याचा विचार केला आहे का? कडुलिंब आणि गूळ खाण्याची परंपरा प्राचीन काळापासून चालत आली आहे, त्यामागे कारण म्हणजे बदलत असलेले हवामान. हाच काळ असतो जेव्हा हवामानाचा रंग बदलतो आणि अनेक आजार सोबत घेऊन येतात.

जसजसा उन्हाळा येतो तसतसे त्वचेशी संबंधित अनेक आजारांचा धोका वाढतो, कडुलिंब त्याची शक्यता कमी करण्यास मदत करते.

- कडुलिंबातील अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास मदत करतात. मधुमेहावर नियंत्रण ठेवण्यास मदत होते.
- उष्णतेमुळे पोटाशी संबंधित अनेक आजारांचा प्रादुर्भाव वाढतो, कडुलिंब त्यापासून मुक्त होण्यास खूप मदत करते.
- हे संधिवात आणि स्नायू दुखणे किंवा हवामानातील बदलामुळे वाढणारी सूज यापासून आराम देण्यास मदत करते.
- सौंदर्य वाढवण्यात तसेच पोटाची चरबी कमी करण्यात सर्वात जास्त मदत करते.
- कोंडा, केस गळणे, खाज सुटणे, पुरळ इत्यादीपासून आराम मिळवून देण्यासाठी कडुनिंबाचा पर्याय नाही.

# गुढीपाडवा



गुढीपाडवा हा एक भारतीय सण असून तो हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे चैत्र शुद्ध प्रतिपदेला महाराष्ट्रात साजरा केला जातो. शालिवाहन संवत्सराचा हा पहिला दिवस आहे. वेदांग ज्योतिष या ग्रंथात सांगितलेल्या साडेतीन मुहूर्तांपैकी हा एक मुहूर्त आहे. या दिवशी नवीन वस्तू खरेदी, व्यवसाय प्रारंभ, नव उपक्रमांचा प्रारंभ, सुवर्ण खरेदी इत्यादी गोष्टी केल्या जातात. दारी उभारलेली गुढी हे विजय आणि समृद्धीचे प्रतीक आहे असे मानले जाते. गुढी पाडव्यापासूनच राम जन्मोत्सवाच्या कार्यक्रमाचासुद्धा प्रारंभ होतो.

### गुढीपाडवा – सांस्कृतिक इतिहास

ब्रह्मदेवाने या दिवशी विश्व निर्मिले, असे सांगितले आहे.श्रीराम अयोध्येला परत आले. प्रभू रामचंद्रांनी चौदा वर्षे वनवास भोगून लंकाधिपती रावण व राक्षसांचा पराभव करून या दिवशीच अयोध्येत प्रवेश केला.

शालिवाहन नावाच्या कुंभाराच्या मुलाने शकांचा पराभव करण्यासाठी सहा हजार मातीच्या सैनिकांचे पुतळे तयार केले व त्यात प्राण घालून त्यांच्या साह्याने याच दिवशी शकांचा पराभव केला अशी आख्यायिका प्रचलित आहे. याच शालिवाहन राजाच्या नावाने नवीन कालगणना शालिवाहन शक चालू झाला.प्राचीन मानवाने जेव्हा देवाची कल्पना केली आणि पूजा करायला सुरवात केली तीच देवीच्या, स्त्रीच्या रूपात सुरु केली. ती स्त्री म्हणजे आदिशक्ती, आदिमाता पार्वती असे मानले जाते. पार्वती आणि शंकराचे लग्न पाडव्यादिवशी ठरले. पाडव्यापासून तयारीला सुरवात होऊन तृतीयेला लग्न झाले. पाडव्यादिवशी पार्वतीच्या शक्तिरूपाची पूजा करतात. यालाच चैत्र नवरात्र म्हणतात. लग्नानंतर नवमीला योगिनींची अधिपती म्हणून पार्वतीची अभिषेक झाला. काश्मिरी मुलींना पार्वतीचे रूप असे श्रीकृष्णाने म्हटले आहे. पार्वती लग्न झाले की माहेरवाशिणी म्हणून महिनाभर माहेरी राहते. तेव्हा तिच्या कौतुकासाठी चैत्रगौरीचे हळदीकुंकू केले जाते. अक्षयतृतीया यादिवशी ती सासरी जाते. संदर्भ- शक्रोत्सवाचे उल्लेख संस्कृत रघुवंशात व भासांचे 'मध्यमव्यायोग', शूद्रकाचे 'मृच्छकटिकम्' या नाटकांमध्ये आले आहेत.

### ध्वजांचे पौराणिक उल्लेख

श्रीरामाने रावणावर विजय मिळवून ज्या दिवशी अयोध्येत पुन्हा प्रवेश केला त्या दिवशी, म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदेला नागरिकांनी गुढ्या उभारून उत्सव साजरा केला, अशी पारंपरिक समजूत आहे.

ततोऽभयवकिरंस तव अन्ये लाजैः पुष्पैश च सर्वतः
समुच्छ्रितपताकास्तु रथ्याः पुरवरोत्तमे ||
ततो हय अभ्युच्छ्रयन पौराः पताकास्ते गृहे गृहे
ऐक्ष्वाकाध्युषितं रम्यम् आससाद् पितुर्गृहम् ||

हे वाल्मिकी रामायणातील श्लोक आहेत. ह्यांत गुढी असे कुठेही म्हटले नसून पताका हाच शब्द वापरलेला आहे.

### गुढी शब्दाची उकल

तेलुगू भाषेत गुढी या शब्दाचा अर्थ 'लाकूड अथवा काठी' असा आहे तसाच तो 'तोरण' असाही आहे. दाते, कर्वे लिखित 'महाराष्ट्र शब्दकोशा'चा आधार घेतला तर

"गुढ्या घालुनी वनीं राहूं , म्हणा त्यातें । – प्रला १९ (?)"

असे उदाहरण येते यातील गुढ्या या शब्दाचा अभिप्रेत अर्थ त्या शब्दकोशाने खोपटी, झोपडी, अथवा पाल (रहाण्याची जागा) असा दिला आहे.

हिंदीत कुडी या शब्दाचा एक अर्थ लाकूड उभे करून उभारलेली कुटी अथवा झोपडी असा होतो. इथे ग चा क (अथवा क चा ग) होऊ शकतो ही शक्यता लक्षात घेता येते तरीही राहण्याची जागा या अर्थाने 'गुडी' हा शब्द येऊन दक्षिणेतली खासकरून आंध्रातील स्थलनामांची संख्या अभ्यासली असता, लाकूड या अर्थाने तेलगूतील गुढी या शब्दाचा अधिक वापर आणि जुन्या मराठीतील लाकूड बांबू/काठी ने बनवलेले घर, हे पाहता हा शब्द महाराष्ट्र आणि आंध्र या प्रदेशात गुढी शब्दाचा प्रचार अधिक असावा. शालिवाहनपूर्व काळात कदाचित गुढीचा लाकूड बांबू/काठी हा अर्थ महाराष्ट्रीयांच्या शब्द संग्रहातून मागे पडला असावा पण आंध्रशी घनिष्ट संबंध असलेल्या शालिवाहन राजघराण्याच्या लाकूड बांबू/काठी या अर्थाने तो वापरात राहिला असण्याची शक्यता असू शकते.

### गुढीपाडवा – काठीपूजा

काठीपूजन तसेच उत्सवी काठी ही मानवी इतिहासात विविध समुदायात केली गेलेली एक प्राचीनतम पूजा-परंपरा आहे.

इव्होल्यूशन ऑफ गॉड' या ग्रंथातील ग्रँट ॲलेन यांच्या नोंदीनुसार सायबेरीयातील 'सामोयीड्स' ते दक्षिण आफ्रिकेतील 'दामारा' या जमातींमध्ये काठीपूजेची परंपरा होती.

इस्रायलमधील अशेराह पोल या काठी पूजा परंपरा ज्यू धर्माच्या स्थापनेपूर्वीच्या काळात प्रचलित पूजन पद्धती होत्या.

युरोपात नॉर्वेजियातील चर्च उत्खननामध्ये काठीपूजेच्या परंपरेचे दाखले मिळालेले दिसतात, युरोपातील मेपोल हा काठी उत्सव ख्रिश्चनपूर्व काळापासून ख्रिश्चन धर्मीय विरोधाचा सामना करीत साजरा करताना दिसतात.

पॅसिफिक क्षेत्रात माओरी मिथकातून 'व्हाकापोकोको आतुआ' नावाने शेती-पिकांचा देव रोंगोची पूजा होत आली आहे.

कुक बेटांवरील आदिवासी 'आतुआ राकाऊ' नावाने काठीपूजा करतात.

चीनच्या युनान प्रांतातील मिआओ आणि अनशूनमधील येलांग संस्कृती, व्हिएतनाम मधीले 'के न्यू', कोरियातील 'जाँगशाँग' आणि 'सोटडे',म्यानमार देशातील 'के होते बो' उत्सव ही जगाच्या पाठीवर वेगवेगळया ठिकाणी साजऱ्या झालेल्या अथवा होत आलेल्या काठी उत्सवांची अथवा पूजांची उदाहरणे आहेत.

अमेरिका खंडात देवक-स्तंभाच्या स्वरूपात प्राचीन काठ्यांचे वा स्तंभांचे जतन केले जाते.

भारतीय उपखंडात नेपाळमध्ये काठी उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा होतो, आसाममध्ये काही समुदाय वैशाख महिन्यात 'बास पूजा' साजरी करतात, त्रिपुरा आणि मणिपूर राज्यांत काठी उत्सव परंपरा दिसून येतात; तसेच बलुचिस्तानच्या हिंगलाज देवीस काठी सोबत यात्रेने जाण्याची प्रथा आहे.

राजस्थानात गोगाजी मंदिर येथे व मध्यप्रदेशातील निमाड प्रांतात काठी मातेची पूजा आणि काठी नृत्याची परंपरा आहे.

महाराष्ट्रात गुढीपाढव्याशिवाय जतरकाठी, काठीकवाडी, नंदीध्वज हे काठी-उत्सव साजरे केले जातात.

डॉ. बिद्युत लता रे यांच्या मतानुसार ओरिसा राज्याच्या आदिवासींमध्ये खंबेश्वरी देवीची पूजा हा काठी पूजेचा प्रचलित प्रकार असून खंबेश्वरीची पूजा अर्वाचीन काळात हिंदू धर्मात उत्क्रांत झालेल्या मूर्तिपूजांपेक्षा प्राचीन असावी.

### पूजा पद्धती

संवत्सर फल म्हणजे काय? तर त्या पाडव्यापासून जे संवत्सर म्हणजे वर्ष सुरू होत असते, त्या वर्षाच्या पहिल्या दिवशी आणि नंतरच्या काही विशिष्ट दिवशी असणारी स्थिती – जसे वार, चंद्र, नक्षत्र, सूर्याचे विविध नक्षत्रप्रवेश इत्यादी संदर्भांवरून हे संवत्सर फल दिलेले असते. संवत्सर फलात देशकालाचाही निर्देश असतो, म्हणजे देशाच्या कोणत्या भागात सुखसमृद्धी असेल ते संवत्सर फलात त्रोटकपणे सांगितलेले असते. वर्षप्रतिपदेच्या म्हणजे गुढीपाडव्याच्या दिवशी जो वार असेल त्या वाराचा जो ग्रह असेल तो त्या संवत्सराचा अधिपती असे मानले जाते. म्हणजे आजपासून सुरू होणारे वर्ष हे जर मंगळवारी सुरू होत असेल तर मंगळ हा त्या वर्षाचा अधिपती असे समजले जाते. साठ संवत्सरांची वेगवेगळया पद्धतीने विभागणी केली आहे.

एका विभागणीत पाच संवत्सरांचे एक युग अशा पद्धतीने साठ संवत्सरांची बारा युगे मानली जातात. तसेच संवत्सर चक्रातील ८ व्या भाव नावाच्या संवत्सरापासून विजय या २७ व्या संवत्सरापर्यंत २० संवत्सरांचा स्वामी पालनकर्ता विष्णू आहे असे मानले जाते. ब्रह्मदेवाने पहिली तिथी सर्वात श्रेष्ठ म्हणून घोषित केली. तिला पहिले पद मिळाल्याने ती 'प्रतिपदा' म्हणून ओळखली जाते असे मानले जाते. या तिथीला 'युगादी' तिथी असेही म्हणतात.

या दिवशी उपाध्यायाकडून पंचांग श्रवण म्हणजेच वर्षफल श्रवण करतात. या पंचांग श्रवणाचे फळ असे सांगितले आहे.:-

"तिथेश्च श्रीकरं प्रोक्तं वारादायुष्यावर्धनम् |
नक्षत्राद्धरते पापं योगाद्रोगनिवारणम् ||
करणाच्चिन्तितं कार्यं पञ्चाङ्गफ़लमुत्तमम् |
एतेषां श्रवणान्नित्यं गङ्गास्नानंफलं लभेत्||"

अर्थ – तिथीच्या श्रवणाने लक्ष्मी लाभते.वाराच्या श्रवणाने आयुष्य वाढते. नक्षत्र श्रवणाने पापनाश होतो. योगश्रवणाने रोग जातो. करणश्रवणाने चिंतिलेले कार्य साधते. असे हे पंचांग श्रवणाचे उत्तमफल आहे. त्याच्या नित्य श्रवणाने गंगास्नानाचे फल मिळते.

चैत्र हा अधिकमास असता, काहींच्या मते अधिकमासाच्या शुद्ध प्रतिपदेस वर्षारंभाची धार्मिक कृत्ये करावीत; तर काहींच्या मते ती शुद्ध किंवा निज चैत्राच्या प्रतिपदेस करावी, असा मतभेद आहे. याविषयी धर्मसिंधूने निर्णय दिला आहे तो असा- अभ्यंगस्नानादी कृत्ये अधिक मासाच्या शुद्ध प्रतिपदेसच करावी; पण गुढी उभारणे, कडुलिंबाची पाने खाणे, पंचांग श्रवण करणे या गोष्टी शुद्ध चैत्राच्या प्रतिपदेस कराव्या.

### आरोग्यदृष्ट्या महत्त्व

चैत्र शुद्ध प्रतिपदेला प्रातःकाळी ओवा, मीठ, हिंग, मिरी आणि साखर कडुनिंबाच्या पानांबरोबर वाटून खातात. पचनक्रिया सुधारणे, पित्तनाश करणे, त्वचा रोग बरे करणे,धान्यातील कीड थांबवणे हे आणि असे अनेक औषधी गुण ह्या कडुनिंबाच्या अंगी आहेत असे आयुर्वेदात मानले जाते. शरीराला थंडावा देणाऱ्या कडूनिंबाची पाने अंघोळीच्या पाण्यात घालणे, ती वाटून खाणे हे आरोग्याच्या दृष्टीने हितकारक समजले जाते

### महाराष्ट्रीय गुढीचे लिखित साहित्यिक संदर्भ

संत ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीत अध्याय ४, ६ आणि १४ मध्ये
अधर्माचि अवधी तोडीं । दोषांचीं लिहिलीं फाडीं ।
सज्जनांकरवी गुढी । सुखाची उभवीं ॥ ५० ॥
ऐकें संन्यासी आणि योगी । ऐसी एक्यवाक्यतेची जगीं ।
गुढी उभविली अनेगीं । शास्त्रांतरी ॥ ५२ ॥
माझी अवसरी ते फेडी । विजयाची सांगें गुढी ।
येरु जीवीं म्हणे सांडीं । गोठी यिया ॥ ४१० ॥

संत नामदेव, संत जनाबाई आणि संत चोखामेळा यां सर्वांच्या लेखनांत, गुढीचे उल्लेख येतात. संत चोखोबा त्यांच्या अभंगात म्हणतात

टाळी वाजवावी गुढी उभारावी । वाट हे चालावी पंढरीची ॥१॥

१६ व्या शतकातील संत एकनाथांच्या धार्मिक काव्यात तर गुढी हा शब्द असंख्य वेळा अवतरतो. त्यांच्या वेगवेगळया काव्यातून संत एकनाथ हर्षाची उभवी गुडी, ज्ञातेपणाची ,भक्तिसाम्राज्य, यशाची, रामराज्याची रोकडी, भक्तीची, जैताची, वैराग्याची, भावार्थाची, स्वानंदाची, सायुज्याची, निजधर्माची इत्यादींच्या गुढ्यांची रूपके वापरताना आढळतात. संत एकनाथांना या गुढ्यांची अनुभूती त्यांच्या रोमांचात होते, कीर्तनीं होते, ते गुढी तिन्ही लोकीं, वैकुंठीं, उभारण्याचेही उल्लेख करतात; पण मुख्य म्हणजे रणांगणी उभारली जाण्याचाही उल्लेख करतात.

संत एकनाथांच्या लेखनातील गुढी रणांगणी वापरली जात असल्याचा उल्लेख महत्त्वाचा आहे. महाराष्ट्रीय शब्दकोश अभ्यासल्यास गुढी उजवी देणें म्हणजे विनंती मान्य करणें, संमती देणें, मान्यता देणें आणि गुढी डावी देणें म्हणजे विनंती अमान्य करणें, नापसंत करणें, नाही म्हणणें. असे संकेत शालिवाहन आणि त्यानंतरच्या रणांगणात महाराष्ट्रीयन सैन्याने वापरले असल्यास ते तत्कालीन युद्धाच्या व्यूहातील महत्त्वाचे, कदाचित निर्णायक संदेश साधन असावे. तुकाराम गाथेतील संत तुकारामांच्या ४५२९ क्रमांकाच्या अभंगात ते म्हणतात

"पुढें पाठविलें गोविंदें गोपाळां । देउनि चपळां हातीं गुढी ॥२॥"

१६ व्या शतकातील विष्णुदास नामा यांच्या अभंगात गुढीपाढव्याच्या दिवसाचा उल्लेख 'गुढीयेसी' असा होताना रामाच्या अयोध्येस परत येण्याच्या प्रसंगाशी या अभंगात संगती लावली गेल्याचे दिसते, तो अभंग असा"

आनंदु वो माये नगरी उत्सवो । आजि येईल रामरावो ।।
मोतिया तांदुळ कांडिती बाळा । गाती वेळोवेळा रामचंद्र ।।
अजिंक्य जिंकोनी आले कौसल्यानंदन । धन्य आजि दिन सोनियाचा ।।
कनक दंड चवऱ्या ढळताती रामा । विष्णुदास नामा गुढीयेसी ||

# पाडवा सण...



साजरा गुढी पाडवा
जाणूनखरी संस्कृती
विक्रम संवत निर्मी
भास्कराचार्य गणिती

वनवास सरे रामाचा
निघाले अयोध्दे प्रति
राज्याभिषेक सोहळा
सुशोभित सार्थनृपती

क्रुरकौरव गेले लयास
सुखे नांदे द्रौपदी पति
सिंहासनावर धर्मराज
पांडव राज्य अधिपती


संत झुलेलाल प्रकटे
त्या सिंधसमाज प्रांती
महर्षी दयानंद करती
आर्य समाज निर्मीती

शिख द्वितीय गुरूवर्य
अंग देवजी ये जगती
ब्रह्म पुराणातील नोंदी
झालीविश्वाची उत्पत्ती

वसंतऋतु होई आरंभ
पल्लवीनव्याने धारती
रात्र लहान दिस मोठा
नव प्रारंभ करी धरती

- हेमंत मुसरीफ पुणे
9730306996

# भारताने केलेले उपकार बांगलादेश विसरला




१९७१ पर्यंत बांगलादेश हा पाकिस्तानचा एक भाग होता. तेंव्हा त्याला पूर्व पाकिस्तान असे म्हंटले जायचे. पाकिस्तानच्या राजवटीत बांगलादेशातील नागरिकांवर अनन्वित अत्याचार होत होते. बांगलादेश हा पाकिस्तानचा घटक असूनही बांगलादेशी नागरिकांवर पाकिस्तान जुलुम करत होता. पाकिस्तानच्या जुलमी राजवटीला कंटाळून बांगलादेशाचे तात्कालिन नेते शेख मुजिबिर रहेमान यांनी पाकिस्तानी सरकार विरुद्ध बंड पुकारले. त्यांच्या या बंडास बांगलादेशी नागरिकांनी प्रतिसाद दिला आणि लोक रस्त्यांवर उतरले मात्र पाकिस्तानने दडपशाही मार्गाने हे आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला तेंव्हा शेख मुजीबिर रेहमान यांनी भारताच्या तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याकडे मदतीची याचना केली. इंदिरा गांधी यांनी तत्काळ बांगलादेशी नागरिकांना पाठिंबा दिला आणि भारतीय लष्कराने पाकिस्तानशी मुकाबला करून बांगलादेशला पाकिस्तानच्या गुलामीतून मुक्त केले. पाकिस्तानच्या निर्मितीत भारताचा मोठा वाटा आहे नव्हे भारतामुळेच बांगलादेशाची निर्मिती झाली आहे. पाकिस्तानच्या जुलमी राजवटीतून मुक्त झाल्या पासून बांगलादेश आणि भारताचे संबंध मैत्रीचेच राहिले आहेत. मोठ्या भावाच्या रुपात भारताने बांगलादेशला नेहमीच त्यांच्या संकटात मदत केली मात्र आता परिस्थिती बदलली आहे. बांगलादेश मधील सध्याचे सरकार आणि बांगलादेशी नागरिक भारताच्या उपकाराला विसरली असून भारतालाच शत्रू मानू लागली आहेत. बांगलादेशात सध्या भारता विरुद्ध मोठा जनक्षोभ पाहायला मिळत आहे. बांगलादेशाच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांचे सरकार पाडून तेथील कट्टरपंथीयांनी सत्ता हस्तगत केली. कट्टरपंथीय, लष्कर आणि जनतेचा रोष पाहून शेख हसीना यांनी भारतात पलायन केले. शेख हसीना यांचे भारताशी सौहार्दाचे संबंध होते म्हणूनच भारताने त्यांना भारतात आश्रय दिला कदाचित हेच तेथील नवनियुक्त सरकारला आणि कट्टरपंथीयांना रुचले नसावे म्हणूनच त्यांनी बांगलादेशातील हिंदू अल्पसंख्यांक नागरिकांना लक्ष करण्यास सुरुवात केले. गेल्या काही महिन्यात बांगलादेशातील हिंदू मंदिरांवर आणि हिंदू नागरिकांवर हल्ले होऊ लागले. मागील काही महिन्यात बांगलादेशात हिंदूवरील हल्ल्याच्या ३०० घटना घडल्या आहेत. यात काही नागरिकांना जीव देखील गमवावा लागला आहे. हिंदूंच्या मंदिरांवर आणि घरांवर जाणीवपूर्वक हल्ले केले जात आहेत. हिंदूंनी बांगलादेश सोडून जावे असे जाहीरपणे इशारे दिले जात आहेत. या कट्टरपंथीय हल्लेखोरांना रोखण्यात तेथील डॉ मोहंमद युनूस यांचे सरकार अपयशी ठरत आहे किंबहुना या हल्लेखोरांना तेच पाठीशी घालत आहेत. बांगलादेशातील अल्पसंख्याक हिंदूंचे संरक्षण करणे हे तेथील सरकारचे कर्तव्यच आहे मात्र आपले कर्तव्य विसरून तेथील सरकार कट्टरपंथीयांना मोकळीक देत आहे. इतकेच नाही तर बांगलादेशात भारत विरोधी वातावरण निर्माण व्हावे यासाठी प्रयत्न करत आहे. डॉ मोहंमद युनूस हे नोबेल पारितोषिक विजेते आहेत. त्यांची बांगलादेशाचा हंगामी पंतप्रधानपदी निवड झाल्यावर भारताने त्याचे स्वागत केले होते. त्यांच्याकडून न्याय आणि समानतेची अपेक्षा होती मात्र आता ती अपेक्षा फोल ठरली. त्यांच्या कारकीर्दीत भारत आणि बांगलादेश यांच्यात मैत्रीचे संबंध प्रस्थापित होतील असे वाटले होते पण त्यांनी मात्र भारताशी पंगा घेण्याचेच ठरवले आहे. भारताने केलेले उपकार बांगलादेश आता विसरला आहे म्हणूनच भारताच्या पंतप्रधानांना त्याची पुन्हा आठवण करून द्यावी लागली.२६ मार्च १९७१ रोजी बांगलादेशाची निर्मिती झाली. या घटनेला यावर्षी ५५ वर्ष पूर्ण झाली. बांगलादेशात त्यांचा स्थापना दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यावर्षी ही तो तसा साजरा करण्यात आला. दरवर्षी बांगलादेश स्थापना दिनी बांगलादेशचे पंतप्रधान देशवासीयांना स्थापना दिनाच्या शुभेच्छा देताना बांगलादेश निर्मितीत भारताने केलेल्या मदतीचे स्मरण करून भारताचे आभार मानतात मात्र यावेळी प्रथमच बांगलादेशने भारताचे आभार मानले नाही इतकेच नाही तर बांगलादेश निर्मितीत भारताने दिलेल्या योगदानाची साधी दखलही घेतली नाही. हे पहिल्यांदाच घडले आहे म्हणूनच भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बांगलादेश सरकारचे हंगामी पंतप्रधान डॉ. मोहंमद युनूस यांना शुभेच्छा पत्र पाठवून स्मरण करून दिले की १९७१ च्या मुक्ती संग्रामामुळे भारत आणि बांगलादेश दरम्यान नवीन संबंधांना सुरुवात झाली आहे हा दिवस दोन्ही देशांच्या भागीदारी आणि त्याग यांची आठवण करून देतो. आम्ही दोन्ही देशांमधील हे संबंध आणखी दृढ करण्यासाठी वचनबध्द आहोत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या पत्रातून बांगलादेशला शालजोडीतून मारतानाच भारताने बांगलादेश निर्मितीत केलेल्या मदतीची आठवण करून दिली आहे अर्थात या पत्रातून बोध घेऊन तरी बांगलादेशने आपल्या वर्तणुकीत बदल करायला हवा. भारताशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित होणे हे बांगलादेशाच्याच हिताचे आहे. पाकिस्तान आणि बांगलादेशाच्या नादी लागून भारताशी वैर पत्करणे म्हणजे स्वतःच स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेणे हे बांगलादेश ने लवकरात लवकर समजून घ्यायला हवे कारण पाकिस्तान आणि चीन हे कधीही कोणाचे मित्र होऊ शकत नाही. जिथे फायदा तिथेच मैत्री असे या दोन्ही देशांचे धोरण आहे. आशिया खंडातील भारतचे वर्चस्व कमी करण्यासाठी हे दोन देश बांगलादेशाचा वापर करून घेत आहेत. उद्या यांची गरज संपली की हे देश बांगलादेशला वाऱ्यावर सोडून देतील तेंव्हा बांगलादेशाची अवस्था ना घर का ना घाट का अशी होईल. त्यामुळे बांगलादेशने आताच सावध होऊन भारताशी पुन्हा मैत्रीचे संबंध प्रस्थपित करायला हवे.

लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
## जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित

प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं. ३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं. २०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं. २०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं. २०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं. ४१११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी

संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे

Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

## शहराच्या समस्या व विकासकामांच्या प्रश्नांसाठी
# गणेश पाटील यांची थेट नवी दिल्लीत बैठक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदन येथे पालघरचे खासदार डॉ. हेमंत सावरा यांची मर्चेंट नेवी ऑफिसर गणेश पाटील यांनी भेट घेऊन विवध समस्या आणि विकास कामांसंदर्भात चर्चा करण्यात आली. यावेळी गाव परिवर्तन संघर्ष समितीच्या वतीने खासदारांना समस्या संदर्भात निवेदन पत्र देण्यात आले. खासदारांनी देखील वेळ देऊन विषय समजून घेतले व त्यावर सकारात्मक प्रतिसाद दिला.

मौजे-गोखिवरे (गावराईपाडा) येथील स.नं. 233/- मध्ये उप प्रादेशिक परिवहन सोबत हक्काच्या गुरचरण जागेत मैदान, तलाव, समाजमंदिर व इतर या ग्रामस्थांच्या मागणी विषयी, बिलालपाडा गावराई पाडा येथील गावठाण जागा हडप केल्या बाबत, प्ले ग्राउंड साठी आरक्षित असलेल्या जागेत प्ले ग्राउंड बनवून ते जनसामान्यांना खुले करण्याबाबत, तसेच वसई विरार महानगर पालिकेकडे हस्तांतरण केलेले रस्ते दुरुस्त करणे बाबत गणेश पाटील यांनी खासदार डॉ. हेमंत सावरा यांना निवेदन दिले आहे. आपल्या गावासाठी, शहरासाठी काम करण्याची इच्छा असल्यास थेट दिल्ली येथे जाऊन काम करता येत. विकासकामांबाबत दिल्लीत चर्चा करण्याचा अनुभव आला आणि खासदारांना बघून व त्यांचा कामाची पद्धत बघून सुद्धा एका प्रकारे जनहितार्थ कार्य करण्यासाठी ऊर्जा व प्रोत्साहन मिळाले असल्याची प्रतिक्रिया गणेश पाटील यांनी दिली.

# व्हॉईस ऑफ मिडिया मुरबाड तालुक्याची कार्यकारिणी जाहीर




## तालुका अध्यक्ष पदी श्याम राऊत यांची सर्वानुमते बिनविरोध निवड!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : लढा पत्रकारिता आणि पत्रकारांसाठी,,हे ब्रिद घेऊन पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या "व्हॉईस ऑफ मिडिया,, या आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करणाऱ्या संघटनेच्या मुरबाड तालुका कार्यकारिणीची सर्वसाधारण सभा आज मुरबाड येथील शिवनेरी शासकीय विश्रामगृह म्हसारोड मुरबाड येथे संघटनेचे ठाणे जिल्हा अध्यक्ष .मंगल डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच संघटनेचे डिजिटल विंगचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष .बाळासाहेब भालेराव ,, ठाणे जिल्हा उपाध्यक्ष .राजेश भांगे,यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.या सभेत मुरबाड तालुका अध्यक्ष पदी जेष्ठ पत्रकार .श्यामभाऊ राऊत यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच उपाध्यक्ष पदी पत्रकार दिलीप घुडे,व निलेश अहिरे, सरचिटणीस पदी -पद्माकर दळवी, चिटणीस पदी-जनशक्तीचे जिवन शिंदे, कोषाध्यक्ष म्हणून -संदिप पष्टे, तालुका संघटक -श्री.सुरेश भालेराव, प्रसिद्धी प्रमुख -योगेश तेलवणे , प्रवक्ते पदी-सुधाकर वाघ, कार्याध्यक्ष पदी -अरुण ठाकरे, कायदेशीर सल्लागार म्हणून ॲड.किशोर गायकवाड, कार्यालयीन प्रमुख -शंकर आगिवले,तर कार्यकारिणी सदस्य म्हणून एस.एल.पाटील, नितेश डोंगरे,बाळा भांगे,गितेश पवार,, इत्यादी सदस्य उपस्थित होते.या सर्वांना वरिष्ठांच्या मार्गदर्शनाने नवनियुक्त्या देण्यात आल्या. यावेळी बाळासाहेब भालेराव यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.तर जिल्हा अध्यक्ष श्री. मंगलजी डोंगरे यांनी संघटनेचे कामकाज कशा पद्धतीने चालवायचं, संघटनेची ध्येय उदिधिष्टे व कार्यप्रणाली बाबत माहिती देऊन, भविष्यात पत्रकार मित्रांसाठी संघटना कशा पद्धतीने उपक्रम राबवणार आहेत.याबाबत मार्गदर्शन केले.

## पीएम इंटर्नशिप योजनेच्या माध्यमातून
# युवांना रोजगाराच्या संधी उपलब्ध

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



भिवंडी : शासनाच्या पीएम इंटर्नशिप योजनेच्या माध्यमातून देशातील उच्च ५०० कंपन्यांमध्ये एक कोटी युवक/युवतींना इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सदर योजनेचा लाभ भिवंडी निजामपुर शहरातील जास्तीत जास्त युवा / युवतींनी घेऊन रोजगाराच्या दिशेने पाऊल टाकावे, असे आवाहन भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचे श्री. अनमोल सागर, मा. आयुक्त तथा प्रशासक, यांनी केले आहे.

पीएम इंटर्नशिप योजनाः-

* योजनेसाठी लाभार्थ्याचे वय २१ ते २४ मध्ये असणे आवश्यक आहे.
* लाभार्थी १० वी, १२ वी, ITI, पदवीधर इत्यादी शैक्षणिक पात्रता धारण केलेला असावा.
* इंटर्नशिप कालावधी हा १२ महिन्याचा असेल.
* इंटर्नशिपच्या कालावधीमध्ये प्रती रु. ५,०००/- एवढे मानधन देय असेल, तसेच एकरकम लाभ रु. ६,०००/- व विमा सुविधा उपलब्ध असेल. सदरील रक्कम शासन स्तरावरून दिले जाणार आहेत.
* लाभार्थी युवक/युवतीने स्वतः https://pminternship.mca.gov.in/login/ या website वर जाऊन आपली दि. ३१ मार्च २०२५ पूर्वी नोंदणी करावी.
* नोंदणी करून आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत.

यासाठी लागणारी आवश्यक माहिती वरील वेबसाईट वर देण्यात आली आहे. किंवा आपल्या महानगरपालिका कार्यालयामध्ये दीअंयो राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, नविन प्रशासकीय इमारत ६ वा मजला, ६०५, जकातनाका, भिवंडी (NULM) कक्षाशी संपर्क साधावा.सदर योजनेमध्ये बेरोजगार युवा/युवती, बचत गट लाभार्थी, कचरा वेचक, गीग कामगार (website आधारीत सेवा पुरवीणारे), बांधकाम कामगार मजूर यांना सुद्धा नोंदणी करता येऊ शकेल, अशी माहिती श्री. अनमोल सागर, मा. प्रशासक तथा आयुक्त, यांनी दिली.

## हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी देशभरात
# सामूहिक हनुमान चालीसा पठण



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी सनातन संस्थेच्या वतीने आज देशभरात सामूहिक श्री हनुमान चालिसा पठणाचा कार्यक्रम घेण्यात आला. या निमित्ताने ठिकठिकाणी असलेल्या श्री हनुमान मंदिरे, श्रीराम मंदिरे यांसह अन्य शेकडो ठिकाणी २० हजारांहून भाविक, साधक, हिंदुत्वनिष्ठ सहभागी झाले. यात समविचारी संघटनांचे प्रतिनिधी, अधिवक्ते, उद्योजक, विचारवंत आदी विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळीही सहभागी झाली होती. तसेच विविध जिज्ञासू या पठणाच्या कार्यक्रमात उत्साहपूर्ण सहभागी झाले होते. मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे जिल्ह्यातून १ हजाराहून अधिक हिंदूंनी घेतला या उपक्रमाचा लाभ घेतला. ठाणे येथील पितांबरी उद्योगसमूहातील कर्मचाऱ्यांनी सुद्धा यावेळी सामूहिक श्री हनुमान चालिसा पठण केले.

२९ मार्च या दिवशी शनिगोचर अर्थात् श्री शनिदेवानी कुंभ राशीतून मीन राशीत प्रवेश केला आहे. या शनिगोचरचा भाविकांना आध्यात्मिक स्तरावर लाभ होण्यासाठी, तसेच हिंदु राष्ट्राची लवकरात लवकर स्थापना होण्यासाठी देशभरात सामूहिक श्री हनुमान चालिसा पठणाचा कार्यक्रम घेण्यात आला. श्री हनुमान चालिसा पठणाच्या वेळी श्री हनुमंत आणि श्री शनिदेव यांच्या चरणी हिंदु राष्ट्राची लवकरात लवकर स्थापना होण्यासाठी सामूहिक प्रार्थना करण्यात आली. या उपक्रमात सहभागी झालेल्या अनेकांनी आध्यात्मिक अनुभूतीचा लाभ घेतला, तसेच राष्ट्र आणि धर्म कार्य करतांना अशा उपक्रमांतून ऊर्जा मिळाल्याचे मनोगत भाविकांनी व्यक्त केले.

# स्वागतम

स्वागत नवसंवत्सरा
जरुर करा आवेशात
गत संवत्सरा निरोप
द्यावा तसाचं जोशात

जुने वर्ष आले तेधवा
शिरशिरी ती स्पर्शात
कसे वागलो रे तेंव्हा
पहावे जरा आरशात

जाणा-या पाहुण्याला
रहावे आपण लक्षात
समाधाने जावे त्याने
आनंद असो मोक्षात

नवसंवत्सर असेकसे
गुपीत सगळे कोषात
उमेद जाणवे उत्साही
आनंद दिशा दिशात

शुभेच्छांचा वर्षाव हो
रे वेग वेगळ्याभाषात
निर्भेळ निरामय स्नेह
असो कुठल्या वेशात

उभारा प्रयास गुढ्या
जिव्हाळा हवा वक्षात
माणूस आहोत सक्षम
काळ ठेवील लक्षात

-- हेमंत मुसरीफ पुणे.
9730306996



## ग्रील सोल,व वरली कंपनीच्या माध्यमातून
# विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



मुरबाड : तालुक्यातील मौजे खोपिवली गावचा सुपुत्र व धडाडीचा युवा कार्यकर्ता तथा ग्रामपंचायत सदस्य मुकुंद कराळे यांनी आतापर्यंत निराधार,गोरगरिब, शालेय विद्यार्थी या घटकांसाठी निस्वार्थी पणे भरीव कामगिरी केली असुन,कुठे पाण्याची समस्या, कुठे रस्त्यांची तर कुठे शालेय इमारत, शैक्षणिक समस्या सोडविण्यासाठी जिद्दीने सामाजिक, राजकीय संघटनांचा आधार घेऊन सर्वसामान्य माणसाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे.कोणाला घर नाही अशा लोकांना घरकुल योजनेतून घर कसे देता येईल.असे एक ना अनेक प्रश्न सोडविण्यासाठी जिद्दीने प्रयत्न करणारा माणूस म्हणून त्यांनी आतापर्यंत उल्लेखनीय काम केले आहे.तर नुकताच त्यांनी ग्रीन सोल कंपनी मुंबई व वरळी कंपनीच्या माध्यमातून मुरबाड तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये जवळपास नऊ हजार विद्यार्थ्यांना मोफत दप्तरे,चपला,व बसण्यासाठी चटई ,इत्यादी शालेपयोगी साहित्य वाटप केले असून,आज तालुक्यातील मौजे आगाशी या गावी ४०, विद्यार्थ्यांना दप्तरे, चपला,चटई,या साहित्याचे वाटप केले आहे.हे सर्व करताना त्यांना मोरेश्वर मोहपे यांचे फार मोठे योगदान होते असल्याचे आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.तर आगाशी येथील शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रमाप्रसंगी येथील ग्रामस्थांनी आपल्या हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील प्रतिष्ठान च्या वतीने सन्मान पत्र देऊन मुकुंद कराळे यांच्या सामाजिक कार्याचा गौरव केला आहे.याप्रसंगी प्रतिष्ठानचे प्रभाकर शेळके, गुरुनाथ शेळके, मोरेश्वर मोहपे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कमलाकर शेळके,दवणे ,कुळाला ,दिपक शेळके,उमेश तरे, भगवान शेळके, इत्यादी मान्यवर जि.प.प्राथमिक शाळा आगाशी येथील शैक्षणिक साहित्य वाटप प्रसंगी उपस्थित होते.

## नववर्ष गुढीपाडवा निमित्त
# मुरबाडमध्ये भव्य शोभायात्रेचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : हिंदू नववर्ष अर्थात मराठमोळा सण म्हणजे गुढीपाडवा होय.खरं तर गुढी हे शौर्याचे व आनंदाचे प्रतिक आहे. भारतात हा सण शहरासह ग्रामीण भागात मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा केला जातो. महाराष्ट्रात ठिकठिकाणी भव्य शोभायात्रा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून या नववर्षाचे स्वागत केले जाते.

मुरबाड शहरातही यावर्षी 30 मार्च रोजी रविवारी सकाळी 7 वा.गुढी पाडवा निमित्ताने नववर्ष स्वागत यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. मुरबाड शहरातील प्रसिद्ध असलेल्या प्रभु श्रीराम मंदिर ते बाजार पेठेतून नगरपंचायत कार्यालया पर्यंत व पुन्हा बाजारपेठेतून श्रीराम मंदिर अशी शोभायात्रा असणार आहे. शोभायात्रेत पारंपरिक वेशभूषा,ढोल ताशांचा गजर,लेझीम पथक व विविध सांस्कृतिक कार्यक्रम यावेळी पाहायला मिळणार आहेत.

नववर्ष स्वागत समिती मुरबाड शहराच्या वतीने या शोभायात्रेचे आयोजन होत असून स्वागताध्यक्ष म्हणून मुरबाड शहराचे प्रथम नागरिक तथा नगरपंचायतचे नगराध्यक्ष श्री संतोष चौधरी असणार आहेत. तर या शोभायात्रेत सर्व मुरबाड करांनी सामिल होण्याचे आवाहन स्वागत समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# केडीएमसीची बेवारस वाहनांवर जप्तीची कारवाई



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रातील रस्त्यावरील वाहतूकीची कोंडी कमी व्हावी आणि पादचा-यांना रस्त्यावरील रहदारीतून ये-जा करणे सुलभ व्हावे या दृष्टीकोनातून महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांच्या निर्देशानुसार फ प्रभागाच्या सहा. आयुक्त हेमा मुंबरकर यांनी डोंबिवली पूर्व येथील 90 फीट रोड परिसरातील रस्त्यांवर, पदपथांवर भरपूर दिवसांपासून उभी असलेली असलेली ३ तीन चाकी वाहने (रिक्षा), १ चारचाकी वाहन (छोटा टेम्पो)), अशी एकूण ४ बेवारस वाहने जप्त करून करुन खंबाळपाडा येथील वाहन तळावर जमा केली. हि कारवाई अतिक्रमण निर्मूलन विभागाचे कर्मचारी यांच्या मदतीने आणि १ हायड्रा, १डंपर, यांच्या सहाय्याने करण्यात आली.

# मिरा भाईंदर महानगरपालिकेचे कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरु
## परिवहन मंत्री मा. प्रताप सरनाईक यांच्या शुभहस्ते लोकार्पण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



भिवंडी : मीराभाईंदर महानगरपालिका, कोटक एज्युकेशन फाउंडेशन आणि टेक महिंद्रा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महापालिका क्षेतील ११ , १२वी तसेच ग्रॅज्युएट झालेल्या युवक-युवतीसाठी एक नाविन्यपूर्ण कौशल्य प्रशिक्षण केंद्राचे लोकार्पण नुकताच परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या शुभहस्ते करण्यात आले आहे. या केंद्राच्या माध्यमातून मोफत विविध व्यावसायिक कोर्सेसचे प्रशिक्षण देण्यात येणार असून, प्रशिक्षणार्थींना भविष्यात नोकरीच्या संधी देखील उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या शुभारंभ प्रसंगी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ३६ शाळांमध्ये शिकणाऱ्या साडेनऊ हजार विद्यार्थ्यांनी पार्श्वभूमी सारखी नसल्याने, त्यांना बांधकाम, डिलिव्हरी अशा असंघटीत क्षेत्रामध्ये काम करण्यास भाग पाडते. मात्र आपल्या विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल असावे अशाच विचारांच्या प्रेरणेतून आपण 'Emplyability @18' आणि 'Campus Placement @ MBMC' हे उपक्रम सुरू केले. या उपक्रमांतर्गत, कौशल्य प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. या प्रशिक्षण केंद्रात, बैंकिंग फायनॅन्शिअल सर्विसेस अँड रिटेल सेल्स अँड इन्शुरन्स तसेच कस्टमर रिलेशनशिप अँड सेल्स हे दोन अभ्यासक्रम पूर्णपणे मोफत असणार आहेत आणि अभ्यासक्रमात विषयाव्यतिरिक्त इंग्रजी संवाद ,व्यक्तिमत्त्व विकास, संगणक कौशल्य, इंडस्ट्री विजिट आणि तज्ञ मार्गदर्शन हे सर्व ज्ञान दिले जाणार आहे. तसेच नोकरीची हमीही देण्यात आलेली आहे. हे दोन्ही अभ्यासक्रम एप्रिल २०२५ मध्ये सुरू होणार आहेत, मोठ्या संख्येने तरुण विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमास प्रवेश घेतला आहे.

या उपक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडले. यावेळी मार्गदर्शन करताना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले की, "आजकालच्या आधुनिक युगामध्ये अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी विविध कौशल्य प्राप्त प्रशिक्षित युवकांची मोठ्या प्रमाणात गरज आहे. व्यावसायिक दृष्टिकोन हा प्रत्येक उद्योग,व्यवसायाचा आत्मा आहे. त्यामुळे युवकांना रोजगार निर्मितीच्या उद्देशाने उद्योग निर्माण करणे हे जसं राजकीय व्यवस्थेचे कर्तव्य आहे तसेच त्या उद्योगांना आवश्यक असणारे कुशल मनुष्यबळ निर्माण तितकेच महत्वाचे आहे. असे त्यांनी सांगितले.

महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांनी आपल्या भाषणातून महत्त्वपूर्ण बाबीवर प्रकाश टाकला. "शिक्षण व्यवस्थेमधून केवळ पदवीधर तयार होण्यापेक्षा त्यांच्या हाताला काम मिळेल, अशी कौशल्ये प्राप्त करून देणे ही आमची जबाबदारी आहे. त्यामुळे अशा प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातून कुशल मनुष्यबळ निर्माण करणे ही काळाची गरज बनली आहे. हे प्रशिक्षण केंद्र केवळ तरुणांचे भविष्य उज्वल करेल असे नाही, तर राष्ट्रनिर्मितीमध्ये त्यांचे महत्वपूर्ण योगदानही ठरेल. तसेच भविष्यातील गरजेनुसार आणखी असे प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात येतील तसेच विविध क्षेत्रात प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांचेही महापालिकेत स्वागत करण्यात येईल, असे आवाहनही प्रशिक्षण संस्थांना आयुक्त तथा प्रशासक राधा विनोद शर्मा, यांनी शेवटी केले.

या कार्यक्रमाप्रसंगी अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे,अतिरिक्त आयुक्त डॉ. सचिन बांगर, उपयुक्त प्रसाद शिंगटे, सहाय्यक आयुक्त (शिक्षण) दिपाली जोशी आणि महापालिकेचे इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. निधी निधी रामाणे (टेक महिंद्रा संचालक), अभिजीत बेडेकर (कोटक एज्युकेशन फाउंडेशन उन्नती प्रकल्प प्रमुख ), अमीर एजाज (कोटक एज्युकेशन फाउंडेशन उन्नती प्रकल्प प्रमुख),आदी मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली. यासह मोठ्या संख्येने मिरा भाईंदर शहरातील तरुण, तरुणी मोठ्या संख्येत उपस्थित होते.





# नवी मुंबई महापालिकेला मिळाले दोन 'स्कॉच' पुरस्कार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : नवी मुंबई शहरात 'कार्यक्षम व शाश्वत जलव्यवस्थापन प्रणाली' आणि 'कॅन्सर विषयक काळजी घेणारी कार्यप्रणाली' अशा दोन्ही प्रकल्पांची पालिका प्रशासनाने यशस्वी अंमलबजावणी केली असून याबद्दल नवी मुंबई महापालिकेस देशातील प्रतिष्ठित 'स्कॉच' पुरस्काराने नवी दिल्ली येथील 'स्कॉच समीट'च्या १०० व्या विशेष समारंभात सन्मानीत केले. भारताला एक उत्तम आणि समर्थ राष्ट्र बनविण्यासाठी परिश्रम घेणाऱ्या व्यक्ती, संस्थांना 'स्कॉच' पुरस्कार प्रदान करून राष्ट्रीय पातळीवर सन्मानीत करण्यात येते. स्कॉच पुरस्कारांची निवड पद्धती अत्यंत पारदर्शक असून यामध्ये तज्ज्ञांकडून प्रकल्प समीक्षा करण्यात येते. जाणकार समीक्षकांव्दारे तपासणी आणि फेरतपासणी करण्यात येते. तसेच अभ्यासू नागरिकांकडून मतदान पद्धतीचा अवलंब करण्यात येतो. अशा वेगवेगळ्या कसोट्या पार करून सुयोग्य व्यक्ती वा संस्थांना पुरस्कारास पात्र समजले जाते. या काटेकोर मूल्यमापनातून नवी मुंबई महापालिकेचे 'कार्यक्षम व शाश्वत जलव्यवस्थापन प्रणाली' आणि 'कॅन्सर विषयक काळजी घेणारी कार्यप्रणाली' हे दोन प्रकल्प मानाच्या 'स्कॉच' अंतिम पुरस्कारास पात्र ठरले आहेत.

## संक्षिप्त

# स्नेहल येवला नारीशक्ती पुरस्काराने सन्मानित

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमी या संस्थेने दादर येथे नुकताच आयोजित करण्यात आलेल्या "नारीशक्ती सन्मान पुरस्कार" सोहळयात ठाणे घोडबंदर रोडवरील कासारवडवली येथील सुप्रसिध्द निवेदिका स्नेहल राजेंद्र येवला यांना राज्यस्तरीय कर्तुत्ववान नारीशक्ती पुरस्कार देऊन सन्मानित केले.

स्नेहल येवला या उच्चशिक्षित असुन, लॅबव्हॅली एंटरप्राईजेस नावाने प्रयोगशाळांना साहित्य पुरवण्याचा त्या व्यवसायही करतात. उद्योजिका म्हणून त्यांनी स्वतःचं एक वेगळं स्थान निर्माण केले आहे. निवेदिका,कवयित्री, अभिनय या विविध क्षेत्रात त्यांनी त्यांच्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे तसेच 'स्नेह गंधाली' हा कवितासंग्रह प्रकाशित झालेला आहे.

स्नेहल येवला यांच्या चतुरस्त्र व्यक्तिमत्वाची दखल मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमीने घेउन कवी, साहित्यिक डॉ. सुनील सावंत, कवी, कलाकार नंदकुमार सावंत, पोलिस दलातील सायबर सुरक्षा अधिकारी सारिका जाधव-ढवळे, सामाजिक कार्यकर्त्या नलिनी सूर्यवंशी यांच्या हस्ते राज्य स्तरीय कर्तृत्ववान नारी शक्ती पुरस्कार त्यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. त्यामुळे समाजातील विविध क्षेत्रातून त्यां त्यांचे अभिनंदन होत असून भविष्यामध्ये शुभेच्छाही व्यक्त केल्या जात आहेत.

# जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा विभागाचे स्थलांतर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ठाणे व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान कार्यालये ही सार्वजनिक बांधकाम विभाग आवार, स्टेशन रोड, ठाणे (प) येथे होती. सद्यस्थितीत बांधकाम विभाग आवारातील कार्यालयांचे नुतनीकरण करण्यात येत असल्याने जिल्हा परिषदेच्या कामकाजाच्या दृष्टीकोणातून ग्रामीण घरकुल योजना, लखपतीदिदी अशा योजनांचे कामकाज विस्तृत असल्याने योग्य तो समन्वय ठेवण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ठाणे व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान हे विभाग ठाणे महानगरपालिका पार्किंग प्लाझा, 8 व्या मजल्यावर, इर्स्टन एक्सप्रेस हायवे, सर्विस रोड, जुपिटर हॉस्पिटल जवळ, ठाणे (प)- 400606 येथे स्थलांतरित करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे यांनी दिली.

### राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत

# वैद्यकिय अधिकारी यांचे प्रशिक्षण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत सहसंचालक आरोग्य सेवा (क्षय व कुष्ठरोग) पुणे यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार, जिल्हा क्षयरोग अधिकारी ठाणे डॉ. ए. एस. मुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १३ मार्च, २०२५ रोजी येथे कोन गावं श्रीप्रसाद हॉटेल, भिवंडी येथे ४५ डॉक्टरांची व दि. २७ मार्च, २०२५ रोजी एस ३ हॉटेल, अंबरनाथ बदलापूर रोड, चिखली, अंबरनाथ येथे ६५ डॉक्टरांची कार्यशाळा डॉक्टर्स फॉर यु संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेमध्ये जागतिक आरोग्य संघटनेचे सल्लागार डॉ. अविनाश जाधव यांनी क्षयरोग कार्यक्रमातील नवीन उपचार पद्धती यावर प्रशिक्षण घेतले व डॉ. राजाभाऊ येवले यांनी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमात (NTEP) खाजगी वैद्यकीय व्यवसायिकांचा सहभाग व त्याचे महत्त्व यावर प्रशिक्षण दिले. जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. ए. एस. मुंजाळ यांनी प्रस्ताविक करताना कार्यशाळा दररोजच्या कामकाजात महत्त्वाची भुमिका बजावणार असल्याचे सांगितले.यावेळी भिवंडी आय. एम. ए संघटनेचे अध्यक्ष डॉ. भूषण कुलकर्णी, अंबरनाथ आय. एम. ए. संघटनेचे अध्यक्ष डॉ. गणेश राठोड, डॉ. हरेश लापसिया, जनरल प्रॅक्टिशनर संघटनेचे अध्यक्ष डॉ. शैलेंद्र गायकवाड, छातीरोग तज्ञ डॉ. रेखा जाजो, प्याथोलोजिस्ट डॉ. अनिरुद्ध रणदिवे, डॉ. समीर कुलकर्णी, डॉक्टर्स फॉर यु संस्थेचे कार्यक्रम व्यवस्थापक संकेत गायकवाड आदी उपस्थित होते.

याप्रसंगी वैद्यकीय अधिकारी ठाणे डॉ. तरुलता धानके यांनी आभार व्यक्त केले. CME कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा पी. पी. एम. समन्वयक हेमंत सपकाळ यांनी डॉक्टर्स फॉर यु संस्थे सोबत समन्वयाने कार्यक्रमाचे आयोजन उत्तम केले, तसेच वरिष्ठ उपचार व लाबोरेटरी पर्यवेक्षक सतीश देशपांडे व शामराव पाटील यांनी सूत्रसंचालन केले. क्षयरोग पथक भिवंडी व अंबरनाथ येथील सर्व राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमातील कर्मचारी यांच्या सक्रिय सहभागाने कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न झाला.

**नियमित वाचा**
**दैं. ठाणे जीवनदीप वार्ता**

# उल्हास, वालधुनी नद्यांच्या प्रदूषणमुक्तीसाठी कृती आराखडा

## १५ दिवसात जलपर्णी काढण्यास सुरुवात, टास्क फोर्सचीही स्थापना होणार

## खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नांना यश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : उल्हास नदीत सांडपाण्यामुळे वाढणारी जलपर्णी आणि वालधुनी नदीची प्रदूषणामुळे झालेली वाताहत दूर करण्यासाठी शुक्रवारी राज्याचे नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता आणि महाराष्ट्र प्रदेश नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांच्या उपस्थितीत कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी एका विशेष बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीत उल्हास आणि वालधुनी नदीच्या प्रदूषणमुक्तीसाठी नवा कृती आराखडा तयार करण्यावर एकमत झाले.

उल्हास नदीतील जलपर्णी काढण्यास येत्या १५ दिवसात सुरूवात केली जाणार असून त्यासाठी यंत्रे भाडेतत्वावर घेतली जाणार आहेत. काही तात्काळ आणि काही दीर्घकालीन उपाययोजना करण्यावर यावेळी एकमत झाले. येत्या काही दिवसात याची अंमलबजावणी होणार असून नद्यांच्या प्रदूषण मुक्तीसाठी सर्व पालिका, प्रदुषण नियंत्रण मंडळ, राज्य सरकार संयुक्तरित्या काम करणार असल्याचेही यावेळी ठरवण्यात आले.

गेल्या काही दिवसांपासून उल्हास नदीतील जलपर्णीचा विषय गंभीर झाला आहे. कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात जलपर्णीला हटवण्यासाठी आंदोलनेही सुरू आहेत. याची गंभीर दखल घेत कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मुख्यालयात एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. राज्याचे नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव असिम गुप्ता आणि महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जलपर्णी काढणे, उल्हास नदी आणि वालधुनी नदी प्रदुषण रोखण्यासाठी उपाययोजना करणे, यासाठी काही तात्काळ उपाययोजना आणि काही दिर्घकालीन योजना राबवण्यावर यावेळी एकमत झाले. एका सामाजिक संस्थेच्या तक्रारीनंतर उल्हास आणि वालधुनी नदी प्रदुषणाचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचला होता. त्यावेळी सर्वोच्च न्यायालयाने निरी संस्थेला कृती आराखडा तयार करण्याचे आदेश दिले होते. या आराखड्यात गरजेनुसार बदल करण्यासाठी नदी वाहत असलेल्या पालिकांनी एकत्रितपणे सांडपाण्याचे स्त्रोत तपासून ते जागा उपलब्ध असलेल्या ठिकाणापर्यंत नेण्यात यावेत, अशा सूचना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केल्या.

# सेव पेंढारकर मोहिमेअंतर्गत एमआयडीसी कार्यालयासमोर १ एप्रिल पासून उपोषण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : डोंबिवली शिक्षण प्रसारक मंडळाच्या अनधिकृत बांधकामावर कारवाई न केल्यामुळे सेव पेंढारकर मोहिमेअंतर्गत एमआयडीसी कार्यालयासमोर मंगळवार दिनांक १ एप्रिल पासून बेमुदत साखळी उपोषण करण्यात येणार असल्याची माहिती सेव पेंढारकर महाविद्यालय मोहिमेचे संयोजक सोनु सुरवसे यांनी दिली.

एमआयडीसीने कोणतीही ठोस व ठळक कारवाई न केल्यामुळे नाईलाज झाल्याने सेव पेंढारकर मोहिमे अंतर्गत एमआयडीसी कार्यालयासमोर मंगळवार १ एप्रिल पासून बेमुदत साखळी उपोषण करत असल्याची माहिती सोनु सुरवसे यांनी दिली.

# महिलांच्या आरोग्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेचा उपक्रम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



भिवंडी : महिलांचे आरोग्य सुधारण्यासाठी आणि मासिक पाळी स्वच्छतेविषयी समाजात जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने पुढाकार घेत महिला व बालकल्याण विभाग आणि चंद्रमोहन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक उत्तरदायीत्व प्रकल्पांतर्गत अंतर्गत विशेष उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला आहे. या कार्यक्रमावेळी 'महिला आरोग्य' या विषयावर नियोजनात्मक योजना राबविण्यावर भर दिला जाईल याबाबत महापालिका आयुका तथा प्रशासक राधाविनोद शर्मा (भा.प्र.से.) यांनी आपल्या भाषणात विशेष उल्लेख केला.

या उपक्रमा अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शाळांमधील इयत्ता ६ वी ते १० वी मधील एक हजार विद्यार्थिनी व एक हजार गरजू महिलांना सॅनिटरी नॅपकिनचे वाटप करण्यात आले. पुढे वर्षभर रॅानिटरी नॅपकिन्स या गहिला आणि विद्यार्थिनींना देण्यात येणार आहेत. याचबरोबर मासिक पाळी स्वच्छतेविषयी मार्गदर्शन करणारा जागृतीपर कार्यक्रम देखील घेण्यात आला. या उपक्रमाला विद्यार्थिनी व महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे, महिलांना मासिक पाळी स्वच्छतेचे महत्त्व समजावून सांगणे आणि आरोग्याची निगा राखण्यासाठी योग्य उपायांचा अंगीकार करण्यास प्रेरित करणे हे होते. डॉ. प्राजक्ता समेळ यांनी समाजात मासिक पाळीविषयी अस्तित्वात असलेल्या गैरसमज व अंधश्रद्धांवर प्रकाश टाकत, स्वच्छ सॅनिटरी नॅपकिन वापरण्याचे फायदे आणि स्वच्छतेचे नियम स्पष्ट केले.

सदर उपक्रमादरम्यान, विद्यार्थिनींच्या शैक्षणिक आणि वैज्ञानिक ज्ञानात वाढ व्हावी यासाठी स्मार्ट बोर्ड आणि STEM किट्सचे वाटप देखील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षणात प्रोत्साहन देण्यासाठी हे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे.

महापालिका आयुका तथा प्रशासक राधाविनोद शर्मा (भा.प्र.से.) यांनी आपल्या भाषणात सांगितले की, महिला आणि विद्यार्थिनींसाठी सामाजिक आणि आरोग्यविषयक उपक्रम सातत्याने राबवले जाणार असून, समाजाचा सर्वांगीण विकासासाठी महिलांचे आरोग्य आणि स्वच्छतेबाबतची जाणीवही करून देणे उद्या संदर्भात जनजागृती करणे अत्यंत आवश्यक आहे.

सदर कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त डॉ.संभाजी पानपट्टे, उपायुक्त (मुख्यालय) कल्पिता पिंपळे, उपायुक्त प्रसाद शिगटे, चंद्रमोहन फाउंडेशनच्या संचालक अनिशा भंडारी, लोपारेक्स प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक मनिष जैन, गोल्डन सोसंच वरिष्ठ उपाध्यक्ष सुदर्शन सिंग आणि प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. प्राजक्ता समेळ यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

महानगरपालिकेच्या या स्तुत्य उपक्रमामुळे महिलांच्या आरोग्याविषयी जनजागृती वाढेल आणि समाजात सकारात्मक परिवर्तन घडून येईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# जीवनदीप महाविद्यालय खर्डी मध्ये निबंध स्पर्धा संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



खर्डी : राज्य खादी व ग्रामोद्योग आयोग मुंबई व जीवनदीप महाविद्यालय खर्डी यांच्या संयुक्त विद्यमाने आज दिनांक २९/०३/२०२५ रोजी महाविद्यालय स्तरावर हिंदी निबंध लेखन स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धा करिता खादी संदर्भातील विषय विद्यार्थ्यांना देण्यात आले होते. या स्पर्धेत महाविद्यालयातील ५५ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. या निबंध लेखन स्पर्धेचे विजेते अनुक्रमे प्रथम कु.स्नेहा पाटील(११ वी विज्ञान), द्वितीय कु. सदफ खलील दळवी (बी.ए प्रथम वर्ष),तृतीय कु.समीक्षा देशमुख (११ वी वाणिज्य)तर उत्तेजनार्थ कु. शिफा शेख (बी.ए प्रथम वर्ष), कु. यश केदारे(११ वी कला), कु.पायल इदे हे आहेत.

तद्नंतर या निबंध स्पर्धाचा बक्षीस वितरण समारंभ सहसंचालक श्री. उदय बऱ्हाटे यांच्या हस्ते संपन्न झाला. याप्रसंगी त्यांनी खादी व ग्रामोद्योग क्षेत्रातील रोजगारा संबधी विविध योजनांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.संदेश गायकवाड यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. दिप्ती मोरे-चव्हाण यांनी केले.

सर्व प्राध्यापक वृंद व विद्यार्थी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

# नारिवली ग्रामपंचायतच्या सरपंच पदी योगेश भोईर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



मुरबाड : मुरबाड तालुक्यातील प्रतिष्ठित असलेल्या नारिवली ग्रामपंचायती च्या रिक्त असलेल्या सरपंच पदी नवयुवक योगेश भाऊ भोईर यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. योगेश भोईर हा एक सामान्य कुटुंबातील सुशिक्षित तरूण असून त्यांचे माता पित्याचे छत्र हरपले असताना सुद्धा आपल्या गावासाठी काम करण्याची त्यांची लहानपणापासून ईच्छा होती.मागिल निवडणूकीत गावाने त्यांना सदस्य म्हणून निवडून दिले होते तर आज त्यांची संपूर्ण गृप ग्रामपंचायतीने बिनविरोध सरपंच करून त्यांच्यावर विश्वास टाकला आहे. लहानपणापासून त्यांच्यावर तालुक्याचे माजी सभापती व बँकेचे संचालक उल्हासभाऊ बांगर यांचा राजकीय सहवास लाभला असून यापुढे त्यांच्याच मार्गदर्शनाखाली गावासाठी विकास कामे करणार असल्याचे सांगितले. त्यांच्या या निवडीमुळे उल्हास बांगर यांच्या सह नारिवलीच्या माजी सरपंच हर्षला भोईर, अर्चना भोईर, भास्कर बांगर यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तर यावेळी नवनिर्वाचित सरपंचांनी सर्व सदस्यांचे , ग्रामस्थांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

# बुलसेई अचिव्हमेंट एआयएम गेम रायफल शूटिंग स्पर्धा उत्साहात संपन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : अत्यंत अपेक्षित असलेला एआयएम गेम रायफल शूटिंग लर्न विथ फन फॉर एमेच्युअर इव्हेंटचा यशस्वीपणे नुकताच समारोप झाला. ज्यात अपवादात्मक निशानेबाजी, खिलाडूवृत्ती आणि स्पर्धात्मक भावना दिसून आली. व्यवसायाच्या विविध क्षेत्रातील सहभागी, विद्यार्थी आणि निवृत्त व्यक्तींनी अचूकता, लक्ष केंद्रित आणि दृढनिश्चय दाखवल्या मुळे कार्यक्रम यशस्वी झाला.

लर्न विथ फन फॉर ॲमेच्युअर्स हा 2 दिवसीय कार्यक्रम कल्याण पश्चिम येथील आर.बी. कारिया इंग्लिश स्कूल क्रीडांगणावर आयोजित करण्यात आला होता. ज्याची संकल्पना आणि आयोजन अकादमी ऑफ टार्गेट स्पोर्ट्स, आर अँड जी इन्स्टिट्यूट ऑफ प्रोफेशनल ट्रेनिंग्स प्रायव्हेट लिमिटेडच्या विभागाद्वारे करण्यात आले होते, ते डी.बी. जाधव यांनी प्रायोजित केले होते.

6 श्रेणींमध्ये 49 सहभागी आणि 18 पदकांसह, यात 10 ते 77 वर्षे वयोगटातील व्यक्तींचे धैर्य आणि उत्कटता दिसून आली. उत्कंठावर्धक कामगिरी आणि प्रभावी स्कोअरसह, या वर्षीच्या एआयएम गेम ने कल्याण शहराच्या इतिहासात लर्न विथ फन हौशी रायफल शूटिंगमध्ये एक नवीन बेंचमार्क प्रस्थापित केला आहे, जो पहिला रायफल शूटिंग इव्हेंट म्हणून एक नवीन मैलाचा दगड ठरला आहे.

प्रायोजक मच्छिंद्र जाधव संचालक डी.बी. जाधव ग्रुप आणि आयुष हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. राजेश राजू यांनी या कार्यक्रमात सहभाग घेऊन अपवादात्मक खिलाडूवृत्ती आणि सौहार्द दाखवला. विशेष म्हणजे बृहद एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष ॲड. दीपक भट्ट, महेश पाठक, सचिव सुनील पटेल आणि आर. बी. कारिया शाळेच्या मुख्याध्यापिका दिपाली राजपूत यांनी देखील भाग घेऊन आणि स्पोर्ट्समॅनशिपचे ठिकाण भागीदार म्हणून दाखवून कार्यक्रमाचा आनंद लुटला.इतर उल्लेखनीय सहभागींमध्ये डॉ. सचिन तिवारी, डॉ. प्रशांत मुन्हे, डॉ. किशोर देसाई, आरपीएफचे सुरेश पांडे, महाराष्ट्र पोलिसांचे विकास गांगुर्डे आणि सीआयडी शाखेचे मंगेश किटे यांचा समावेश होता. बँका, म्युच्युअल फंड, विमा, फार्मा इंडस्ट्री, कॉलेज आणि शालेय विद्यार्थ्यांमधील सहभागींनी भविष्यातील नेमबाज म्हणून त्यांची कौशल्ये शिकून दाखवली. अकादमी ऑफ टार्गेट स्पोर्ट्सने कल्याणकरांचे कौशल्य वाढवण्यासाठी आणि तरुणांना लक्ष्यित खेळांच्या खेळात साचेबद्ध करण्यासाठी एक अग्रणी आणि दूरदर्शी म्हणून आपले पाऊल ठेवले.

गणेश भट्ट, बिपीन दिवाणे, चंद्रकांत बसर आणि आकाश काळे हे परिक्षेत्र अधिकारी सौम्या भट्ट आणि सई देवणे यांच्यासह आयोजन संघात होते. अकादमी ऑफ टार्गेट स्पोर्ट्सचे ध्येय 'तरुणांमध्ये सचोटी, शिस्त आणि क्रीडापटूची मूलभूत मूल्ये रुजवणे' हे आहे.

# श्री राम नवमी निमित्त अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील मौजे न्हावे येथे सतत १३ वर्षे श्रीराम नवमी निमील अखंड हरीनाम सप्ताहाचे ४ एप्रील ते ७ एप्रील या कालावधीत अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन केले जाते आहे यात हभप भाग्यश्री भाग्यवंत . हभप धनाजी महाराज ह.भ.प योगेश लांबे महाराज . ह.भ.प आरती शिंगोळे या नामवंत किर्तनकारांची किर्तने आयोजित केली आहेत . तसेच रामविजय ग्रंथाचे पारायण हरीपाठ भजन हे सतत तिन दिवस चालणार आहे . . या सप्ताहाला आनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत . या कार्यकमाचे संयोजन लोकमित्र रमेश हिंदुराव हे १३ वर्ष करीत आसुन या अमृत पर्वाचा सर्वांनी लाभ घ्यावा. असे आवाहन लोक मित्र रमेश हिंदुराव यांनी केले आहे




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024